(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

महाराष्ट्र पोलीस

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक:-पोमसं/३-अ/पदो/पोउपनि से.क्ला.मा. ते सपोनि फ.क्ला.मा./२९/२०२३ मुंबई, दिनांक :- 9/१०/२०२५

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१, व

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दि.१४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात येत असून, दि.२५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. ०१ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक सेकंड क्लास मास्टर यांना सहायक पोलीस निरीक्षक फर्स्ट क्लास मास्टर या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रता तपासून निवडसूची तयार केली आहे. सहायक पोलीस निरीक्षक फर्स्ट क्लास मास्टर यांची ६ पदे मंजूर व रिक्त असल्यामुळे सन २०२४-२५ च्या निवडसूचीवरील पात्र अधिकारी यांना सहायक पोलीस निरीक्षक फर्स्ट क्लास मास्टर या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि:१४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्याची आवश्यकता नाही.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद पोलीस उप निरीक्षक सेकंड क्लास मास्टर यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून **"सहायक पोलीस निरीक्षक फर्स्ट क्लास मास्टर "** या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ४ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | पोलीस उप निरीक्षक सेकंड क्लास मास्टर यांचे नांव | सध्याची नेमणूक | सहायक पोलीस निरीक्षक फर्स्ट क्लास मास्टर पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | प्रदीप रामदास जुनारे | मिरा-भाईंदर, वसई-विरार | नवी मुंबई |
| २. | जितेंद्र बाजीराव साळुंखे | मुंबई शहर | ठाणे ग्रामीण |
| ३. | साजिदखाँ शफीउल्लाखाँ खान | मिरा-भाईंदर, वसई-विरार | नवी मुंबई |
| ४ | दत्तात्रय मारुती शिर्के | मिरा-भाईंदर, वसई-विरार | पालघर |
| ५. | साईनाथ गोविंद दळवी | रायगड | पालघर |
| ६. | दत्तात्रय भिमराव भोसले | नवी मुंबई | पालघर |

३. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे, त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

Scanned with OKEN Scanner

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,
(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,
(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,
(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५. मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**६. उपरोक्त आदेशातील अ.क्र.२ वरील पोलीस उप निरीक्षक सेकंड क्लास मास्टर / जितेंद्र बाजीराव साळुंखे हे पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्यानंतर त्यांना पुढील आदेश होईपर्यंत मुंबई शहर येथे संलग्न करण्यात येत आहे.**

**७. पदोन्नत झालेल्या वरील सर्व पोलीस अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / मिरा भाईंदर, वसई विरार / नवी मुंबई
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे / कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई
अपर पोलीस आयुक्त, मोटार परिवहन विभाग, नागपाडा, बृहन्मुंबई.
पोलीस अधीक्षक, रायगड / ठाणे ग्रामीण / पालघर

२. पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रा. यांनी उपरोक्त आदेशातील अ.क्र. २ वरील पोलीस उप निरीक्षक सेकंड क्लास मास्टर / जितेंद्र बाजीराव साळुंखे यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर करुन घेवून, त्यांना संलग्न केलेल्या पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या ठिकाणी हजर होण्याकरीता कार्यमुक्त करावे.

अपर पोलीस अधीक्षक, तांत्रिक ,मोटार परिवहन विभाग, नौका विभाग, ठाणे आणि कोकण परिक्षेत्र

**प्रत सविनय सादर,**

मा. अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश पोलीस उप निरीक्षक सेकंड क्लास मास्टर यांना सहायक पोलीस निरीक्षक फर्स्ट क्लास मास्टर (PSI Second Class Master to API First Class Master) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २/ ९/ ११/ ११-अ/ ३६/४०.

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

D/MT first class second class Promotion-2024-25\पदोन्नती फर्स्ट क्लास सेकंड क्लास आदेश २०२.docx

Scanned with OKEN Scanner